# ग्रामीण विकासाचा सुधारित केंद्रीय दृष्टीकोन

**प्रा. डॉ. पी. टी. निकम**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय नांदगाव,ता. नांदगाव जि. नासिक.

**प्रास्ताविक :**

ग्रामीण विकासाचा अभ्यास करताना ग्रामीण समाजाचे स्वरूप अभ्यासणे आवश्यक आहे. ग्रामीण समाजजीवनात निर्माण होणारया समस्यांवर उपाययोजना योजून ग्रामीण समाजाचा विकास सर्वांगाने घडवून आणण्यासाठी विविध स्तरांवरती प्रयत्न केले जात आहेत. याबरोबरच ग्रामीण विकासविषयक योजना, कार्यक्रम राबविण्यात येवू लागले. यामुळे ग्रामीण ग्रामीण समाजाचे स्वरूप बदलत आहे. या बदलापाठीमागची पार्श्वभूमी आणि ग्रामीण समाजाच्या विकासासाठी कारणीभूत असलेल्या घटकांना समजण्यासाठी ग्रामीण विकासाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. भारतात ६,४१,००० गावे आहेत आणि एकूण लोकसंख्ये पैकी ७२.२ टक्के लोकसंख्याया ग्रामीण भागात आहे. त्यापैकी १,४५,००० खेड्यांमध्ये प्रत्येकी ५०० ते ९९९ लोक राहतात; १,३०,००० खेड्यांची लोकसंख्या दर खेड्यामागे १००० ते १९९९ च्या दरम्यान आहे; आणि १,२८,००० खेड्यांची लोकसंख्या प्रत्येकी २०० ते ४९९ आहे. म्हणूनच भारतातील ग्रामीण क्षेत्राचा विकास झाल्यास आपोआपच देशाचा सर्वांगीण विकास घडून येवू शकतो असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

१. ग्रामीण विकासाचा अर्थ आणि वैशिष्ट्ये अभ्यासणे

२. ग्रामीण विकासाची उद्दिष्ट्ये अभ्यासणे.

३. ग्रामीण विकासाबाबत केंद्रीय योजना आणि त्याबाबत केंद्रीय सुधारित दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत अभ्यासासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. याअंतर्गत वृत्तपत्रे, संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे इत्यादींचा वापर करण्यात आलेला आहे.

**ग्रामीण विकासाचा अर्थ :**

**कार्ल टेलर –** ग्रामीण विकास ही एक अशी प्रक्रिया आहे कि,ज्यामध्ये ग्रामीण लोक आपली आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती सुधारावी यासाठी ज्या प्रक्रियेत सहभागी होतात आणि त्यामुळे ते आपल्या राष्ट्रीय विकासाच्या कार्यक्रमात काम करणारे प्रभावशाली समूह बनतात.

**जागतिक बँक –** ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात सुधारणा करण्यासाठी तयार करण्यात आलेली व्यूहरचना म्हणजे ग्रामीण विकास होय.

ग्रामीण लोकजीवन आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सुधारण्यासाठी ग्रामीण लोकांसाठी राबविण्यात येणारी प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय.

ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांचे जीवनमान त्यांच्या क्रियाशील सहभागामधून उंचावणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

ग्रामीण लोकजीवनातील आर्थिक, सामाजिक,सांस्कृतिक,शैक्षणिक,राजीकीय ई. क्षेत्रामध्ये सुधारणा घडवून आणणे म्हणजेच ग्रामीण विकास होय.

**ग्रामीण विकासाची वैशिष्ट्ये :**



Commerce & Science College Nandgaon

Principal
Arts,Commerce & Science College
Nandgaon-423106(Dist.Nashik)

Scanned by CamScanner

१. ग्रामीण विकास हि सार्वत्रिक चालणारी प्रक्रिया आहे.

२. ग्रामीण विकास हि सर्वांगीण विकासाभिमुख प्रक्रिया आहे .

३. आर्थिकदृष्ट्या दुर्बल समूहाच्या विकासावर ग्रामीण विकासामार्फत भर दिला जातो.

४. ग्रामीण विकासाच्या प्रक्रीयेत लोकांचा सहभाग महत्वपूर्ण असतो.

५. ग्रामीण विकास हि अखंड चालणारी प्रक्रिया आहे.

६. ग्रामीण विकास हे देशविकासाचे महत्वपूर्ण अंग आहे.

७. ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत शासनाची भूमिका महत्वाची असते.

**ग्रामीण विकासाची उद्दिष्ट्ये :**

**१.ग्रामीण भागातील लोकांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणणे :**

भारत कृषिप्रधान देश असल्याने लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा असतो. परंतु शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून असल्याने प्रत्येक वर्षी उत्पाद येईलच याची शेतकऱ्यांना शाश्वती नसते. तसेच ग्रामीण भागात शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी यांचे प्रमाण अधिक असते. त्यांना वर्षभर उपलब्ध होईल असा रोजगार निर्माण करून त्यांच्या उत्पन्नात वाढ करून त्यांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न केला जातो. अशा परिस्थितीत शेतीशी पूरक व्यवसाय पशुपालन, कुक्कुटपालन, मधमाशी पालन मत्स्य पालन रेशीम उत्पादनासाठी रेशमी किड्यांचे पालन यासारखे रोजगार ग्रामीण भागात निर्माण करून रोजगारातून उत्पन्न वाढविणे आणि ग्रामीण लोकांच्या दारिद्र्याचे निर्मुलन करणे हे ग्रामीण विकासाचे महत्वपूर्ण उद्दिष्ट्ये आहे.

**2. ग्रामीण भागातील लोकांचा आरोग्याचा दर्जा सूधारणे :**

ग्रामीण भागात निरक्षरतेचे प्रमाण अधिक असल्याने अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा आणि अज्ञान असते. तसेच अस्वच्छतेचे प्रमाणही जास्त असते. या सर्वांमुळे तेथील आरोग्यावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. आरोग्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट प्रतीचा असतो. त्यामुळे ग्रामीण आरोग्य सुधारण्यासाठी ग्रामीण भागात आरोग्याच्या सुविधांमध्ये वाढ करून आणली पाहिजे. यातून लोकांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य देखील सुदृढ राहते.

**३.ग्रामीण भागातील शैक्षणिक दर्जात सुधारणा करणे :**

ग्रामीण विकासामध्ये सुशिक्षित,सुजान, जागृत डोळसवृत्तीच्या लोकांचा सहभाग आवश्यक असतो.परंतु ग्रामीण भागात शैक्षणिक सोयींचा अभाव असल्यामुळे बहुसंख्य ग्रामीण लोक निरक्षर आणि अंधश्रद्धाळू आहेत. ग्रामीण लोकांना अधिकाधिक साक्षर बनविण्यासाठी अंगणवाडी, बालवाडी, शाळा, हायस्कूल महाविद्यालयांमार्फत शिक्षणाचा प्रसार करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट्ये आहे. यासोबतच ग्रामीण भागातील युवकांना साक्षर करण्यासाठी साक्षरता प्रसार केंद्रे, प्रौढशाळा, रात्रशाळांची निर्मिती करून ग्रामीण युवकांच्या कला कौशल्यांचा विकास करणे.

**४. आरोग्याचा दर्जा सुधारणे :**

बहुतांशी ग्रामीण लोक निरक्षर आहेत. अज्ञान, अंधश्रद्धा, आरोग्य सुविधांचा अभाव, स्वचातेच्या सवयींबाबत उदासीनता यामुळे ग्रामीण लोकांच्या आरोग्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे. ग्रामीण लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी ग्रामीण आरोग्य केंद्रे, लसीकरण तसेच कुटुंब कल्याण केंद्रे, त्याबरोबरच प्रशिक्षित आणि पुरेसे वैद्यकीय अधिकारी, औषधे ई.दींचा. पुरवठा करणे. यासोबतच शौचालये, सांडपाणी, शुद्ध पाणी, आरोग्याबाबतची



Scanned by CamScanner

घ्यावयाची दक्षता, याद्वारे ग्रामीण लोकांचे शारीरिक, मानसिक दृष्ट्या निरोगी मनुष्यबळाची निर्मिती करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट्ये आहे.

**५. दळणवळणाची साधने , तंत्रज्ञानात वाढ घडवून आणणे:**

ग्रामीण भागात पक्के रस्ते, वीज, पाणी ई. पायाभूत सुविधांबरोबरच नवीन तंत्रज्ञानात वाढ घडवून आणणे हे देखील ग्रामीण भागाचे एक महत्वपूर्ण उद्दिष्ट्ये आहे.

**६. पर्यावरणाचे संरक्षण तसेच संतुलन राखणे :**

पर्यावरणाचे संरक्षण करणे हे मानवी समाज आणि शेती क्षेत्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. कारण भारत हा कृषिप्रधान देश आहे. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने मृदसंधारण, पाणलोट क्षेत्राची निर्मिती आणि विकास,वृक्षारोपण कार्यक्रम, गुरांसाठी चार्याची लागवड ई. उपक्रम राबवून पर्यावरणाचे संरक्षण केले जाते. या उपक्रमांमुळे जमीन, पाणी, आणि पिकांची गुणवत्ता राखण्यास मदत होते.

**७. सामाजिक विषमता नष्ट करणे :**

ग्रामीण भागात जातीभेदामुळे सामाजिक विषमता आढळून येते. ग्रामीण समाजातील हि पारंपरिक जातीय विषमता, आर्थिक विषमता आणि सामाजिक विषमता नष्ट करून समता, बंधुत्व, स्वातंत्र्य या लोकशाही मुल्यांवर आधारित असलेली समाजव्यवस्था निर्माण करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट्ये आहे. या दृष्टीने ग्रामीण भागात निरनिराळ्या विकास कार्यक्रमांचे आयोजन करून समाजातील गरीब, श्रीमंत असा वर्गावार्गामधील भेद कमी करणे तसेच ग्रामीण समाजातील स्त्री-पुरुष भेद कमी करून महिलांचा सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी विविध उपक्रम राबविणे हे देखील एक उद्दिष्ट्ये आहे.

**८. शास्त्रीय ज्ञानावर आधारित ग्रामीण जीवनाची उभारणी करणे :**

ग्रामीण लोकजीवनात सध्या तंत्र पद्धतीचा वापर केला जातो. दैनंदिन जीवनात साधे तंत्रज्ञान वापरून ग्रामीण लॉक आपल्या जीवनातील साधेपणा जपत असतात. या ग्रामीण समाजाचे आधुनिक समाजात रुपांतर करण्यासाठी सामाजिक घडामोडी पाठीमागील कारणे, कोणत्याही घटनेची कार्यकारणमीमांसा शास्त्रीय पद्धतीने करणे, उत्पादन प्रक्रियेत आणि दैनंदिन जीवनात अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामीण जीवन सुखमय बनविणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट्ये आहे.

**९. विविध संस्था आणि संघटनांची स्थापना करणे :**

ग्रामीण समाजात परस्पर सहकार्याची भावना निर्माण करून ग्रामीण समुदायाचा विकास करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट्ये आहे. या अनुषंगाने ग्रामीण भागात वाचनालये, तरुण मंडळे, क्रीडा मंडळे, महिला मंडळे, शेतकरी मंडळे, विविध प्रकारच्या सहकारी आणि वित्त संस्था, पतसंस्था आणि संघटना निर्माण करून संघटीत शक्तीद्वारे ग्रामीण विकासाचा विकास करणे हे उद्दिष्ट्ये आहे.

थोडक्यात ग्रामीण भागातील लोकांच्या शक्ती आणि क्षमतांचा विकास लोक सहभागाद्वारे करून ग्रामीण लोकांच्या जीवनात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक अशा सर्व पैलूंचा समतोल विकास साध्य करणे हे केंद्र सरकारचे प्रमुख उद्दिष्ट्ये आहे. या उद्दीष्ट्यांच्या पूर्ततेसाठी **सरकारकडून ग्रामीण विकासाबाबत पुढील विकासाचे दृष्टीकोन स्वीकारल्याचे दिसून येतात:**



Scanned by CamScanner

**अ. बहुउद्देशीय दृष्टीकोन (Multipurpose Approach ) :**

बहुउद्देशीय दृष्टीकोन म्हणजे ज्या दृष्टीकोनात एकाच वेळी एकापेक्षा अधिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यावर भर दिला जातो. या दृष्टिकोनानुसार ग्रामीण लोकजीवनाची विविध क्षेत्रे हि परस्परावलंबी असल्याने त्यांचा एकावेळी विकास करणे हे फाय्देश्य ठरते. भारतात ग्रामीण विकासासाठी हा दृष्टीकोन स्वातंत्र्य प्रामीनंतर स्वीकारण्यात आला. दि. ०२ ऑक्टोबर १९५२ रोजी सुरु करण्यात आलेला समुदाय विकास कार्यक्रम हा या उद्देशावर आधारित होता. या कार्यक्रमामध्ये कृषी विकास, ग्रामीण भागात उद्योगांची स्थापना, साक्षरता प्रसार, आरोग्य सुविधांचा विस्तार, मंडळे, संस्था तसेच पायाभूत सेवा आणि सुविधांची निर्मिती करणे ई. उद्दिष्ट्ये एकाचवेळी साध्य केला जातो.

**ब.किमान पेकेज दृष्टीकोन ( Minimum Package Approach ) :**

किमान पेकेज दृष्टीकोन हा अत्यंत मर्यादित स्वरूपाचा आहे. किमान पेकेज दृष्टीकोन म्हणजे ग्रामीण जीवनाच्या विशिष्ट अशा एकाच पैलूवर किंवा विशिष्ट अशा अंगावर लक्ष केंद्रित केले जाते. व त्या अंगाचा किंवा त्या पैलूचा सर्वांगीण विकास घडवून आणला जातो. प्रकर्षित कृषी जिल्हा कार्यक्रम ह्या कार्यक्रमाचे आयोजन १९६०-६१ मध्ये या दृष्टिकोनावर करण्यात आले होते. या कार्यक्रमाद्वारे शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी निवडक क्षेत्रांवर भर देण्यात आला होता.

**क. लक्ष्य समूह दृष्टीकोन : ( The Target Group Approach)**

या दृष्टीकोनाला विशेष असे महत्व आहे. लक्ष्य समूह दृष्टीकोन म्हणजे, ग्रामीण समाजातील एखाद्या विशिष्ट समूहाचा किंवा गटाचा विकास घडवून आणण्यावर ज्या दृष्टीकोनात भर दिला जातो त्यास लक्ष्य समूह दृष्टीकोन असे म्हणतात. या दृष्टिकोनानुसार ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, छोटे शेतकरी, महिला बालके, शेतमजूर यांच्यापैकी एखाद्या समूहाची निवड करून त्यांच्या विकासावर भर देणे या दृष्टीकोनात समाविष्ट आहे. भारतात लघु शेतकरी आणि भूमिहीन शेतमजुरांसाठी सीमांत शेतकरी व शेतमजूर विकास अभिकरण हि योजना १९७०-७१ मध्ये सुरु करण्यात आली. लहान सुधारकांसाठी लहान शेतकरी विकास अभिकरण हि योजना सुरु करून ग्रामीण भागातील १८ ते ३५ वयोगटातील युवकांसाठी TRYSEM हि योजना सुरु करण्यात आली. याबरोबरच ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम याच दृष्टिकोनावर स्वीकारण्यात आला.

**ड. क्षेत्र विकास दृष्टीकोन ( Area Development Approach ) :**

या दृष्टिकोनानुसार अविकसित क्षेत्राचा विकास घडवून आणणे यावर लक्ष्य केंद्रित करण्यात आलेले असते. एखाद्या क्षेत्राचा विकास झाल्यानंतर त्याचे फायदे काही कालावधीनंतर त्या क्षेत्रातील निम्न स्तरापर्यंत हळू-हळू झिरपत जातात. आणि क्षेत्रीय विकासाचे फायदे समाजातील सर्व स्तरापर्यंत जाऊन पोहचतात. १९७९ मध्ये भारत सरकारने दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना दुष्काळाच्या वेळी पुरेसे अन्न उत्पादन मिळावे म्हणून अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम सुरु केला होता. याच आधारावर आदिवासींचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने आदिवासी क्षेत्र उपाययोजना हा कार्यक्रम सुरु करण्यात आला होता.

**ई.एकात्मिक विकास दृष्टीकोन ( Integrated Development Approach ) :**

ग्रामीण विकासाबाबत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना, कार्यक्रम प्रकल्प,ई. एकीकरण ज्या दृष्टीकोनात केले जाते त्या दृष्टीकोनास एकात्मिक विकास दृष्टीकोन असे म्हणतात.या ग्रामीण विकासाच्या दृष्टिकोनानुसार ग्रामीण विकासाच्या कृषी, कृषिपूरक, ग्रामीण उद्योग, ग्रामीण हस्त उद्योग, ग्रामीण श्रमिकांसाठी कौशल्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन ई. नाविन्यपूर्ण घटकांच्या एकत्रित विकासावर भर देण्यात येतो.



Scanned by CamScanner

ग्रामीण विकासासाठी सरकारी योजना :

| योजनेचे नाव | मंत्रालय | योजनेची सुरुवात | क्षेत्र |
|---|---|---|---|
| प्रधानमंत्री ग्राम सडक योजना | ग्राम विकास | २५.१२.२००० | ग्रामीण विकास |
| राजीव आवास योजना | शहरी गृहनिर्माण | २०१३ | शहरी गृहनिर्माण |
| राजीव गांधी ग्रामीण विध्युतीकरण योजना | उर्जा | एप्रिल २००५ | ग्रामीण उर्जा |
| राष्ट्रीय कृषी विकास योजना | कृषी | ०१/०८/२००७ | कृषी |
| राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना | आरोग्य व कुटुंब कल्याण | ०१/०४/२००८ | विमा |
| प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना | अर्थ | ०९/०५/२०१५ | विमा |
| प्रधानमंत्री जन धन योजना | अर्थ | १८/०८/२०१४ | ग्रामीण विकास |
| संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना | ग्रामीण विकास | २५/०९/२००१ | ग्रामीण स्वयंरोजगार |
| स्वावलंबन | अर्थ | १५/१२/२०११ | ग्रामीण विकास |
| स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना | ग्रामीण विकास | ०१/०४/१९९९ | ग्रामीण रोजगार |
| राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजना | ग्रामविकास | १५/०८/१९९५ | पेन्शन |
| पंतप्रधान आदर्श ग्राम योजना | ग्रामीण विकास | २३/०७/२०१० | आदर्श ग्राम |
| जननी सुरक्षा योजना | उर्जा | एप्रिल २००५ | ग्रामीण उर्जा |
| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | ग्रामीण विकास | ०६/०२/२००६ | ग्रामीण रोजगार |
| पंतप्रधान पिक विमा योजना | कृषी | १३/०१/२०१६ | कृषी |
| अटल पेन्शन योजना | -- | ०९/०५/२०१५ | २०१५ |



Scanned by CamScanner

वरीलप्रमाणे केंद्राने वरील योजना सुरु करून आपला ग्रामीण विकासाबाबतचा दृष्टीकोन कसा व्यापक होत गेला आहे हे दिसून येते .

अलीकडील काळात ग्रामीण विकास मंत्रालयाच्या अंदाजपत्रकातील वरील काही योजनांवर खर्चात कशी वाढ होत गेली आहे ते पुढील पत्रकात दाखविले आहे.

| वित्तीय वर्ष | योजनेचे नाव | खर्च ( करोड रु. ) | वित्तीय वर्षातील ग्रामीण विकासावरील एकूण वर्ष ( करोड रु. ) |
|---|---|---|---|
| २००५-२००६ | प्रधानमंत्री ग्रामसडक योजना<br>संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना | ४२२०.००<br>८५००.०० | २७४९०.०० |
| २००७-२००८ | प्रधानमंत्री ग्रामसडक योजना<br>संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना | ६५००.००<br>३८००.०० | ३७३६०.०० |
| २०१३-२०१४ | प्रधानमंत्री ग्रामसडक योजना<br>महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | २१७००.००<br>३३०००.०० | ८०१९४.०० |
| २०१९-२०२० | प्रधानमंत्री ग्रामसडक योजना<br>महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | १९०००.००<br>६००००.०० | ११७६४७.०० |
| २०२०-२०२१ | प्रधानमंत्री ग्रामसडक योजना<br>महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | १९५००.००<br>६१५००.०० | १२२३९८.०० |
| २०२१-२०२२ | प्रधानमंत्री ग्रामसडक योजना<br>महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | १५०००.००<br>८००००.०० | १४०६८९.०० |

वरील पत्रकात २००५-२००६ या वित्तीय वर्षापासून २०२१-२२ या वर्षापर्यंत विविध योजना आणि त्या योजनांवरील खर्च दाखविला आहे. ग्रामीण विकासाबाबतचा केंद्रीय दृष्टीकोन विस्तारत गेल्यामुळे योजनांवरील खर्चात कशी वाढ होत गेलेली आहे हे वरील पत्रकात दाखविले आहे.

**केंद्रीय अर्थसंकल्प २०२१-२०२२ ची ठळक वैशिष्ट्ये :**

देशाचा पहिला कागदविरहीत डिजिटल अर्थसंकल्प सादर करताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या कि, कोव्हीद-१९ विरुद्ध भारताचा लढा अजूनही सुरूच आहे. आणि कोव्हीड नंतरच्या काळात जगभरात राजकीय, आर्थिक आणि धोरणात्मक संबंध बदलत असताना इतिहासातील हा काळ नव्या युगाची वाट पाहत आहे. आणि त्यात भारत खरोखरच आशावादी आणि आश्वासन पूर्तीचा देश बनण्यासाठी सज्ज आहे.

**केंद्र सरकारच्या २०२१-२२ या वर्षाच्या अर्थसंकल्पावरून ग्रामीण विकासासाठी आरोग्य क्षेत्रासाठी व्यापक दृष्टीकोन दिसून येतो.**

- आरोग्य आणि कल्याण क्षेत्रासाठी २०२०-२१ मधील ९४४५२ कोटी रुपयांच्या तुलनेत २०२१-२२ साठी २२३८४६ कोटी रुपये खर्चासाठी अर्थसंकल्पीय तरतूद जी मागील वर्षाच्या तुलनेत १३७% अधिक आहे.
- कोव्हीड-१९ लसीकरणासाठी ३५००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.
- बालमृत्यू टाळण्यासाठी न्युमोकोकल लस संपूर्ण देशभरात दिली जाण्याचे निश्चित करण्यात आले.
- पंतप्रधान आत्मनिर्भर स्वस्थ भारत योजना या नवीन केंद्र पुरस्कृत योजनेसाठी आगामी ६ वर्षात ६४१८० को.रु. खर्च केला जाण्याचे निश्चित करण्यात आले.



Scanned by CamScanner

**मानव विकास निर्देशांक -२०२० : ठळक बाबी**

- सन २०२० मध्ये UNDP कडून करण्यात आलेल्या सर्वेक्षणात भारताचा क्रमांक १३१ आलेला आहे. एकूण १८९ देशांचा सर्वे करण्यात आला. नॉर्वे –प्रथम , आयर्लंड – द्वितीय ,आणि तिसऱ्या क्रमांकाला स्वीत्झरलँड दिसून येतो. अमेरिका १७ व्या क्रमांकास आहे.
- आरोग्य, शिक्षण, आणि दरडोई उत्पन्नात मोठ्या प्रमाणात बदल झालेला दिसून येतो.
- आरोग्य –सरासरी आयुर्मान -६९.६६ वर्ष (१९६०- ४१ वर्ष , १९९०- ५९ वर्ष , २०००- ६२ वर्ष ,२०१०- ६६ वर्ष इतके होते. )
- शिक्षण ( केंद्र सरकारचा शिक्षण क्षेत्रावरील खर्च २०२०-२१ मध्ये ९९,३०० को.रु. तो २०१४-१५ मध्ये २७,६०० को.रु., २०१७-१८ मध्ये ८१,८०० को.रु. होता. )
- दरडोई उत्पन्न– १,४५,६७९ रु. At current prices GDP Per Capita of India

**समारोप :**

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते, ग्रामीण विकासासाठी वरील तीनही घटक महत्वाचे असून त्यातील सकारात्मक बदल ही देशाच्या जमेची बाजू आहे. मानव विकास निर्देशांक, आरोग्य, पायाभूत सुविधा विविध योजना यांमध्ये अलीकडील झालेल्या बदलावरून असे लक्षात येते कि, केंद्राचा ग्रामीण विकासाबाबतचा दृष्टीकोन खूपच व्यापक बनलेला आहे. आणि त्यात दिवसेंदिवस वाढच होत आहे.

**संदर्भ सूची :**


1. Katar Singh, Rural Development: Principles, Policies and Management ,Sage Publication India Pvt. Ltd.
2. Golahait S. B. ,Rural Development Programmes in India,Altar Publishing House, Delhi.
3. Dr.Sahu Parikshit, Rural Development in Modern India , Neha Publishers Delhi.
4. Tahir Hussain, Tahir Mary, Tahir Riya, Fundamentals of Rural Development, Dreamtech Press, New Delhi.
5. गंगाधर कराळे, ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टीकोन – नीती, कार्यक्रम आणि धोरण ,मंगेश प्रकाशन, नागपूर.
6. डॉ. भगवान सांगळे, ग्रामीण विकास योजना: दशा व दिशा, मुक्तरंग प्रकाशन लातूर.
7. विविध संकेतस्थळे
8. वृत्तपत्रे




Scanned by CamScanner